सकाळ : मुंबई | संपादकीय
ळवार, ६ मे २००८

मोहर आणि मोहरे

# ध्यास पर्यावरणरक्षणाचा



डॉ. माया महाजन

पर्यावरणाच्या रक्षणाचा ध्यास घेऊन त्यांनी वनस्पतीशास्त्रात पदवी घ्यायचं ठरवलं. बालपणापासूनच पर्यावरणाचे बाळकडू मिळाल्याने बारावीच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊनही डॉक्टर, इंजिनिअर या रुळलेल्या वाटा न निवडता डॉ. माया महाजन यांनी स्वतःला समाजासाठी व पर्यावरणरक्षणासाठी झोकून दिले. लहानपणापासून निसर्गाची आवड असल्याने जंगलात भटकणे, नदीकाठी फिरणे हे छंद त्यांनी जोपासले.

वडील डॉ. वि. स. महाजन व आई उमा महाजन हे समाजसेवक. मुलीनेही समाजासाठी काही तरी करायला हवे, असे त्यांना नेहमीच वाटे. घरातही नेहमी समाजाच्या हिताच्या व पर्यावरण संगोपनाच्याच चर्चा कानावर पडत असल्याने या क्षेत्राचाच अधिक अभ्यास करावा, असे त्यांनी मनात पक्के ठरवले. त्यांचे बालपण तासगाव या छोट्याशा गावात गेले. अभ्यासाप्रमाणेच इतर सर्व क्षेत्रातही त्या अग्रेसर असायच्या. शाळेत पहिला नंबर त्यांनी कधीच सोडला नाही. अभ्यासाबरोबरच नृत्य, वक्तृत्व, नाटक इत्यादी क्षेत्रातही त्यांचा मुक्त वावर होता. दहावीत आदर्श विद्यार्थिनीचा किताब पटकावल्यानंतर बारावीतही चांगल्या गुणांनी त्या उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर वनस्पतीशास्त्रात पदवी घेण्याची इच्छा होती; परंतु गावातील कॉलेजमध्ये हा विषय नसल्यामुळे सांगलीच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. बी.एस्सी. बॉटनी केल्यानंतर शिवाजी विद्यापीठातून एम. एस्सी. केले. एमएस्सीनंतर इकॉलॉजी ऑफ मॅनग्रोज
वेस्ट-कोट्स ऑफ महाराष्ट्र यावर डॉ. लीला भोस
मार्गदर्शनाखाली संशोधन केले.

१९९४ मध्ये सलीम अली सेंटर कोईमतू
संशोधक म्हणून त्या रुजू झाल्या. त्यानंतर
पर्यावरणविषयक प्रकल्पांवरही त्यांनी काम
त्यामध्ये निलगिरी बायोस्पीकर रिझर्वमधील सा
व्हॅली नॅशनल पार्क, मुदुमलाई वाईल्ड लाईफ
आदी ठिकाणांचा समावेश आहे. २००० मध्ये
फॉरेस्ट इकॉलॉजी ही पदवी मिळाली. १९९४ ते २
या काळात मुदुमलाई व शिरुवाणीच्या जंगलात मन

फिरून त्यांनी संशोधन केले. २००० ते २००२ मध्ये केरला फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्युटमध्ये पार्टिसिपिटरी फॉरेस्ट मॅनिजमेंटच्या प्रकल्पावर असताना केरळच्या बैनाडच्या जंगलातील आदिवासींसोबत त्यांनी काम केले. त्यांच्यात वनसंपदेबद्दल जागरुकता निर्माण करण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले. उत्तरांचल, गुजरात, भोपाळ, कर्नाटक इत्यादी राज्यातही संशोधनाचे काम त्यांनी केले. त्यानंतर २००४ मध्ये डहाणूच्या पर्यावरण संरक्षणासंबंधी काम केले. डहाणूतील जंगले, खारफुटी, मासेमारी यांचे संरक्षण व्हावे यासाठी वेगवेगळ्या पातळ्यांवरून प्रयत्न केले. शेतकरी, आदिवासी व मासेमारांना एकत्र आणून जगजागृती करण्याचे कामही महाजन यांनी केले. डहाणू परिसर बचाव समितीची स्थापना करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. डॉ. माया महाजन यांचे हे कार्य 'गोदरेज'ने हेरले नसते तरच नवल. २००६ मध्ये गोदरेजच्या मॅनग्रो विभागामध्ये व्यवस्थापक म्हणून त्या रुजू झाल्या. गोदरेजच्या या प्रोजेक्टमध्ये एक हजार ७५० एकर जागेवर विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक व संस्थांमधील अभ्यासू आदींना अभ्यासासाठी खास सोय करण्यात आली आहे. सध्या त्या सोनाबाई फिरोजशा गोदरेज मरीन इकॉलॉजी सेंटरच्या कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. या पार्कमध्ये जागतिक दर्जाच्या सोयी देण्यासाठी त्या आणि त्यांची टीम सध्या व्यस्त आहे. पर्यावरण रक्षणाबाबतचा त्यांचा उत्साह तसेच सह

कार्यांची साथ यामुळे त्या नक्कीच या क्षेत्रात उज्ज्वल यश संपादन करतील, असा विश्वास वाटतो.

– प्रतिनिधी